# शुद्धी पत्रक

जा.क्र -पोउआ/वि.शा./सुरक्षा/संरक्षण/ १००८ /२०२४
पोलीस उप- आयुक्त, विशेष शाखा, पुणे शहर
दिनांक - २४/०८/२०२४

**विषय -** प्रखर बीम लाईट व लेझर बीम लाईट बाबत भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ प्रमाणे प्रतिबंधक आदेश.

**आदेश,**

लोहगाव टेक्नीकल विमानतळ व नागरी विमानतळ, पुणे शहर येथे दिवसा व रात्रौ वेगवेगळ्या एअर लाईन्सची व भारतीय वायु सेनेचे विमाने व हेलिकॉप्टर उतरत असतात व उड्डाण करीत असतात. रात्रीचे वेळी वैमानिकांना दिशा व ठिकाण दाखविण्यासाठी रनवे वर व एटीसी टॉवरकडून संकेतासाठी लाईटचा उपयोग करण्यात येतो.

ज्याअर्थी भारतीय वायुसेनांनी असे निदर्शनास आणुन दिले आहे की, लोहगाव विमानतळाचे वायुक्षेत्राचे (**Air Field**) जवळच्या परिसरात तसेच पुणे शहर पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात विविध कार्यक्रमाच्या वेळेस आकाशामध्ये **प्रखर बीम लाईट व लेझर बीम लाईट** चा उपयोग करण्यात येतो.

माझी अशी खात्री पटली आहे की, अशा **प्रखर बीम लाईट व लेझर बीम लाईट मुळे** वैमानिकाचे डोळे दिपून दुर्घटना होण्याची शक्यता आहे.

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये विशेष पोलीस महानिरीक्षक यांना विशेष कार्यकारी दंडाधिकारी म्हणून नियुक्त करुन कलम १६३ चे विशेष अधिकार प्रदान केलेले आहेत.

त्याअर्थी मी, **रंजन कुमार शर्मा**, **पोलीस सह आयुक्त, पुणे शहर**, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ प्रमाणे प्राप्त झालेल्या अधिकारान्वये असा आदेश देतो की,

लोहगाव वायुसेना व नागरी विमानतळाच्या साधारणपणे १५ कि.मी. अंतराच्या वायुक्षेत्र (Air Field) परिघामध्ये (Radius) व पुणे शहर पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात खालील कृत्यांवर प्रतिबंध करण्यात येत आहे.

कोणत्याही व्यक्तीने किंवा कार्यक्रम आयोजकांनी **प्रखर बीम लाईट व लेझर बीम लाईट** आकाशात सोडू नये. सदरचा सुधारीत आदेश **दिनांक २४/०८/२०२४** रोजी पासून ६० दिवसाकरीता अंमलात राहील.

सदरच्या सुधारीत आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती भारतीय न्याय संहिता कलम २२३ प्रमाणे शिक्षेस पात्र राहील. सदरचा आदेश मी, माझ्या सहीनिशी आज **दिनांक २४/०८/२०२४** रोजी दिला आहे.

**ठिकाण - पुणे शहर,**
**दिनांक :- २४/०८/२०२४**

पोलीस सह आयुक्त पुणे शहर

२४/८/२४
(रंजन कुमार शर्मा)
पोलीस सह.आयुक्त, पुणे शहर, तथा
विशेष पोलीस महानिरीक्षक तथा
विशेष कार्यकारी दंडाधिकारी
(खास अधिकार प्रदान केलेले)